स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/३६ दि. १४/०५/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : भारताचे मा.पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेशी दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत...

संदर्भ : १.मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने केलेले आवाहन
२.मा. प्र.शिक्षण संचालक(उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. १३/०५/२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

मा. प्र.शिक्षण संचालक(उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या पत्रानुसार देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी खालील मुद्द्यांचे पालन करणेबाबत आवाहन केले आहे.

१. सार्वजनिक वाहतुकीचा वापर : शक्य असेल तिथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.
२. इंधन व ऊर्जा बचत : पेट्रोल–डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. 'कार–पूलिंग'(car-pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.
३. परदेश दौरे व अनावश्यक खर्च : सध्याची परकीय चलन साठ्याची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीचे किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.
४. महत्वाच्या/अतिमहत्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतर बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन(Online Meeting) माध्यमातून आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यास प्राधान्य द्यावे.
५. स्वदेशीचा आग्रह : भारताची आयात व वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.
६. जीवनशैलीत बदल : स्थानिक पर्यटनाला(Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहभागातून सदर विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबविण्यात याव्यात. तसेच याबाबतचा अहवाल BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **"जीवनशैली बदलाबाबत जनजागृती उपक्रम"** या विषयाची निवड करून सादर करण्यात यावा. तसेच या उपक्रमाला सोशल मिडियाच्या माध्यमातून प्रसिध्दी द्यावी. सदर कार्यक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबतः मा. प्र.शिक्षण संचालक(उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य


**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिसं/जीवन शैली बदलाबाबत/मवि-१/२०२६/ई /685 दि.१३.५.२०२६

13 MAY 2026

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. सर्व कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषयः भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत.

संदर्भः मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने केलेले आवाहन.

उपरोक्त विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी खालील मुद्द्यांचे पालन करणेबाबत आवाहन केले आहे.

1. सार्वजनिक वाहतुकीचा वापरः शक्य असेल तिथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.
2. इंधन व ऊर्जा बचतः पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. 'कार-पूलिंग' (Car-pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.
3. परदेश दौरे व अनावश्यक खर्चः सध्याची परकीय चलन साठ्याची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीचे किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.
4. महत्वाच्या/अतिमहत्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतर बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून (Online Meetings) आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यास प्राधान्य द्यावे.
5. स्वदेशीचा आग्रहः भारताची आयात व वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.
6. जीवनशैलीत बदलः स्थानिक पर्यटनाला (Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि उच्च शैक्षणिक संस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी. शैक्षणिक संकुलांमध्ये (Campuses) या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबवून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. तरी, आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना आणि विभागांना या संदर्भात तात्काळ सूचना निर्गमित कराव्यात आणि केलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६

प्रत माहितीसाठी सादरः

मा. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-32.
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-32.

Scanned with OKEN Scanner